MHKO050026192016

## नियमित दिवाणी दावा क्र. १८५/२०१६ मधील नि. ३४ वरील आदेश

श्री. राजाराम चंपालाल भुतडा वि. सौ. शोभादेवी रामअवतार जाजु

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा मे. न्यायालयीन आयुक्त यांच्या अहवालाविरुध्द त्यांच्या वरिष्ठांकडे मोजणी अपिल करणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे थोडक्यात म्हणणे असे की, मे. न्यायालयीन आयुक्त यांनी दिलेला अहवाल हा मे. न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन दिलेला असलेने तो अहवाल हा अधिकार बाहया आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतमध्ये दोन दस्तान्वये एकूण ३३०० चौ.फुट म्हणजेच ३०६.० चौ.मि. मालकीची जागा त्यांच्या कब्जे वहिवाटीत गेली ४०–५० वर्षाहून अधिक काळ आहे. मोजणी करते वेळी मोजणी अधिकारी यांनी न्यायालयाचा आदेश असलेली प्रतिवादीचे मालकीचे क्षेत्र २७५.० चौ.फूट म्हणजेच २५.५ चौ.मि याची दखलच घेतलेली नाही. प्रतिवादी यांचे एकूण क्षेत्र ३०५.० चौ.मि. इतकेच दर्शविले आहे. प्रतिवादी हे वादी यांच्या ३९.७५ चौ.मि. वा कोणत्याही क्षेत्रामध्ये वहिवाटी कब्जात नाहीत. वादी यांनी संगनमताने, परस्पर आणि प्रतिवादी यांचे अपरोक्ष व मे. न्यायालयात कागद हजर न करता ती मोजणी अधिकारी यांचेकडे दाखल केलेली आहेत व त्याआधारे चुकीची मोजणी केलेली आहे. प्रतिवादी यांना सदर मोजणीविरुध्द परत मोजणी करुन घेणेचा हक्क, अधिकार आहे. त्याप्रमाणे त्यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे नि. ३५ येथे दाखल केले आहे. प्रतिवादी त्यांचे असे म्हणणे की, प्रतिवादी हे जाणीवपूर्वक सदरचा दावा चालवणेस

विलंब करत आहेत. वादी यांनी दावा हा वादींचे मिळकतीवर केलेले अतिक्रमण काढून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तूत कामी मा. न्यायालयाच्या आदेशाने शासकीय मोजणी झालेली आहे. सदर मोजणीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण केल्याचे स्पष्ट नमुद केले आहे. मोजणी वेळी प्रतिवादी व त्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष हजर होते. त्यावेळी कोणतीही हरकत नोंदवली नाही. अर्जामध्ये मागणी केलेली बाब कायदयाचे तरतुदीमध्ये नाही. प्रतिवादी यांनी अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे दिलेली नाहीत. वादी यांना केवळ विरोध करायचा म्हणून सदर अर्ज दिलेला आहे. अर्जामध्ये कोणतेही कायदेशीर कारण नमूद नाही. त्यामुळे वादी यांचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. प्रस्तुत कामाचे अवलोकन केले. वादी, वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तूतचा दावा अतिक्रमण काढून टाकणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, न्यायालयीन आयुक्तांनी अहवाल हा मे. न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन दिलेला आहे. परंतू प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये मे. न्यायालयाच्या कोणत्या आदेशाचा भंग केले आहे याबाबत काहीही स्पष्टीकरण सांगितलेले नाही. न्यायालयीन आयुक्तांनी केलेली मोजणी ही चुकीची आहे, बेकायदेशीर आहे याकरीता प्रतिवादी यांना संबंधीत खात्याच्या वरीष्ठांकडे अपील करुन दाद मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करणे योग्य होईल.

<u>आदेश</u>

वादीचा नि. ३४ येथील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by SHASHANK SURESH PEDNEKAR
Date: 2024.08.16 11:11:19 +0530

ता. १४/०८/२०२४

(एस.एस.पेडणेकर)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
इचलकरंजी